स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

(मानवविद्या शाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा सारांश)

-: संशोधन विषय :-

‘पारधी जमातीतील स्त्रियांचा दर्जा एक ऐतिहासिक अवलोकन’

(विशेष संदर्भ : परभणी जिल्हा)

-: संशोधक :-

शिंदे कृष्णा दुर्गाजी
एम.ए.बी.एड (इतिहास) पेट

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ.बोचरे जे.एम.
(इतिहास विभाग प्रमुख)
स्व.नितीन महाविद्यालय,पाथरी ता.पाथरी जि.परभणी

-: संशोधन केंद्र :-

नूतन महाविद्यालय,सेलू,जि.परभणी

मार्च,2022

❖ <u>संशोधन विषय निवडीचा उद्देश्य :</u>

या नविनतम आधुनिकतेच्या दुनियेमध्ये समाज जीवन व मानवता ही उच्च व अतिउच्च प्रगत होत आहे. तरी या प्रगतीमध्ये काही उपेक्षित घटक आहेत. त्यांना आजही या प्रगत लोक जीवनामध्ये त्यांचे स्थान हे नगण्य व कवडीमोल दिसून येते.

त्या आदिवासी जमातीतील उपेक्षितांमधील उपेक्षित 'पारधी जमात' याचा आपण ऐतिहासिक दृष्टीकोन ठेवून सविस्तर अभ्यास हा करणार आहोत. आदिवासी पारधी समाजातील उपेक्षित घटकांना योग्य स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हा संशोधन विषय निवडीचा उद्देश्य आहे.

❖ <u>उद्देश्य :-</u>

- यामध्ये 'पारधी जमाती' मधील स्त्रिया यांचे स्थान तपासणे.
- पारधी समाजातील मुले-मुली यांचा शैक्षणिक व आरोग्याच्या दृष्टीने अभ्यास.
- वंचित, उपेक्षित असलेल्या पारधी जमातीचा सामाजिक दर्जा तपासणे.
- महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात येणाऱ्या परभणी जिल्ह्यातील 'पारधी' जमातीचे स्थान तपासणे होय.

❖ <u>संशोधनाचे उद्दिष्टे :-</u>

1) परभणी जिल्ह्यातील पारधी जमात व त्याचा विकास याचा अभ्यास.
2) पारधी समाजातील विकासातील प्रमुख समस्या याचा अभ्यास.
3) पारधी महिलांचा व मुलांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांचे स्थान जाणून घेणे.
4) पारधी स्त्री जीवन आणि जात पंचायत यामधील गुण, दोष जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.
5) पारधी समाजातील मुलींच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे होय.

❖ संशोधनाचे गृहितके :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके संशोधकाचे पुर्वज्ञान अनुभव विवेचन आणि अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे.

- पारधी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी अपेक्षित आहे.
- पारधी जमातीला गुन्हेगार जमातीचा ठप्पा लावणारे कोण? याचा परिचय यात येईल. आपल्याला परभणी जिल्ह्यातील निवडक स्त्रियांचा (सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक स्त्रियांचा) अभ्यास करावयाचा आहे. या संशोधनामध्ये मुख्य समस्या यांची उकल होणार आहे. तरी या आदिवासी जमातीतील स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे काम करायचे आहे. तीचा खरा चेहरा अभ्यासाअंती तिचे दु:ख, कष्ट, एकंदरीत पारधी समाजातील प्रगती मध्ये महिलांचे योगदान तपासून आपल्याला या संशोधन पर गाभा घटकामध्ये मांडावयाचा आहे.
- आदिवासी जमातीमध्ये उपेक्षित असलेल्या पारधी जातीचे समाजातील स्थान निश्चित करणे.
- मराठवाड्यातील पारधी जमातीतील सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक महिलांचे, आणि बालकांचे स्थान व समस्या यांची माहिती अभ्यासातून समोर आणणार आहोत.

❖ संशोधनाची आवश्यकता :

- आदिवासी जीवन व विकास या विषयावर संशोधन करणे.
- आदिवासी कला व संस्कृतीचे जतन करण्यासाठी आवश्यक आहे.
- आदिवासी पारधी समाजाला समाजामध्ये योग्य ती दिशा देण्यासाठी सच्चे संशोधन हे आवश्यक ठरणार आहे.
- आजच्या नवीनतम संगणकीय अंतर जालीय युगामध्ये आपल्याला हा समाज पुढे नेण्यासाठी सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करणे. व समाजापर्यंत ज्ञान गंगा पोहोचवणे नविन सृजनशिल रुपरेखा आजच्या नवीन पिढीकडे मांडणे हे गरजेचे झाले आहे.
- भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या पारधी समाजाला मिळणाऱ्या सवलती व योजना या कितपत या उपेक्षित समाजापर्यंत पोहचतात की नाही ? याचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाची नितांत आवश्यकता आहे.
- महिला अत्याचार,रुढी,परंपरा, बालविकास, वैयक्तिक स्वच्छता, रोगराई या विषयी समाजामध्ये जागरूकता करणे व त्यांना प्रगत समाज जीवन व्यतीत करण्यासाठी त्यावर विविध उपाय-योजना सुचविण्यासाठी संशोधन हे आवश्यक बाब ठरणार आहे.
- या समाजामध्ये बहिष्कृत केलेल्या स्त्रियांना समाज वाळीत टाकत असतो.

❖ संशोधन पध्दती :-

" पारधी जमातीतील स्त्रियांचा दर्जा एक ऐतिहासिक अवलोकन (विशेष संदर्भ परभणी जिल्हा)" या संशोधन विषयासाठी राजकीय कामगीरी चा अभ्यास, संशोधन विषयासाठी ऐतिहासिक पध्दती, संदर्भ पध्दती, सर्वेक्षणात्मक पध्दती व प्रत्यक्ष मुलाखत पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे.

❖ प्रस्तावना :

मी स्वत : एका पारधी कुटूंबातील संशोधक विद्यार्थी असल्यामुळे मी माझ्या उपेक्षित समाज घटकांचे योग्य त्या पातळीपर्यंत जावून संशोधन करण्याचा प्रयत्न करणार आहे. प्राथमिक व दुय्यम साधने यांचा योग्य तो वापर करून संशोधन होणार आहे. त्यातून समाजाला उपयोगी घडेल असे कार्य करणार आहे. त्यामुळे या विषयाचे महत्व, दर्जा व संशोधन पध्दत ही निरपेक्ष व गुणात्मक करण्याचा प्रयत्न करून योग्य तो शोध प्रबंधाला न्याय मिळवून देईल.

1) प्रकरण पहिले : पारधी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

इ.सन 1871 सालच्या गुन्हेगार जमात कायदा ब्रिटीश शासनाने केला आणि हे आदिम हिंदू (पारधी जमात) गुन्हेगार झाले. त्यांच्यावर गुन्हेगारीचा ठपका ठेवण्यात आला. 120 समुदायांना गुन्हेगार जाहीर करण्यात आले. परंतू इ.सन 1952 साली भारत सरकारने हा कायदा रद्द केला, तरीही पारधी या जमातीचा गुन्हेगारीचा ठपका काही केल्या पुसला जात नाही. मुळात ही जात शिकार करून उदरनिर्वाह करत जगणारी आहे. 'शिवलीलामृत-अध्याय-2' मध्ये या पारधी जाती चा उल्लेख आढळतो.काटक, चपळाई, डोंगर वनात राहणारी, काट्या कुपाट्यामध्ये राहणारी अशी ही जमात आहे. अशा या जमातीला समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याचे काम झाले पाहीजे व पारधी जमातीतील तरुणाईच्या शक्तीचा उपयोग देश सेवेसाठी, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा वाढीसाठी फायदा होईल याचाही अभ्यास करणार आहोत. आदिवासी संस्कृती टिकविण्यासाठी संशोधन हे महत्वाचे ठरणार आहे. या सर्व बाबींचा या प्रकरणामध्ये अभ्यास करणार आहोत. आदिवासींच्या संस्कृतीतील प्रमुख उल्लेखनीय बाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहेत.

2) प्रकरण दुसरे : पारधी जमातीची आर्थिक स्थिती :

पारधी जमातीचा पूर्वीचा व्यवसाय म्हणजे शिकार करणे व ती विकून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह केला जात असे. हि जमात प्रामुख्याने शेती, वनात राहणारी होय, मोठ्या पाटलांची व सावकारांच्या शेतीच्या पिकाचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण करतात व बलुतेदारां प्रमाणे, धान्य सुगीच्या हंगामात पारधी लोक जमा करते.

काही आपल्यासाठी ठेवत काही विकून कपडा-लत्ता,औषध-पाणी,तेल-मीठाचे गुजराण करत असतो.पारधी लोक हे प्रामुख्याने ‘गाय’ सांभाळतात याचा शिकारी साठीही उपयोग होतो. एखादी शेळी ही दावणीला असते. तसेच आताचा पारधी समाज हा ऊसतोडीकडे वळलेला आहे, यातुन तो कसे-बसे आपले भरण-पोषण करतो. सर्वात गरीब असणारा हा माझा ‘पारधी’ समाज आहे याचा अभ्यास या प्रकरणात आपण करणार आहोत.

3) प्रकरण तिसरे : पारधी जमातीची शैक्षणिक स्थिती :

‘पारधी’ जमात ही मुळात गुन्हेगार नसूनही पारधी जमातीवर ब्रिटीश कालखंडापासून गुन्हेगार असा ठपका ठेवण्यात असलेला आहे. त्यामुळे या जमातीतील लोकांसोबत चर्चा करायला सुध्दा आजचे लोक भितात. पारधी म्हटले की, आपले दाग-दागिणे, पर्स ते चाचपतात व ते सुरक्षित आहे की नाही पाहतात. या उदाहरणा वरुन असे स्पष्ट दिसून येते की, त्याला समाजामध्ये कवडी मोलाचे स्थान नाही. पारधी समाजातील खरा इतिहास समाजा समोर नसल्याने त्याच्यावर अनेक खोटे आरोप झाले. पालात राहणारे आणि गाईवर गाठोडे लादणाऱ्या लोकाची आर्थिक स्थिती काय असणार ? याची आपण विस्तृत चर्चा करणार आहोत. शिक्षणाचा विचार केला असता या जमातीतील मुले ही क्वचितच शिक्षण घेत असतात व आपल्या आर्थिक नाजूक परिस्थितीमुळे वंचित राहतात.

जेमतेम प्राथमिक शिक्षणही घेता येत नाही. घरचे वातावरण व शैक्षणिक अपुरे साधन सामग्रीमुळे ते शिक्षणापासुन दुरच राहतात, अशा या समाजाचे भवितव्य काय असणार याचा सखोल अभ्यास करणार आहोत व योग्य त्या शिफारशी आपण करणार आहोत.

4) प्रकरण चौथे :पारधी जमातीतील स्त्रिया आणि बालके यांच्या गरजा व समस्या:

हे प्रकरण आपल्या संशोधनाचे मुख्य गाभाघटक आहे. संशोधनाला सुध्दा काही परिसिमा असतात.त्यामुळे आपण परभणी जिल्ह्यातील संदर्भ घेवून संशोधन कार्य करणार आहोत. संशोधन करत असताना “पारधी जमातीतील स्त्रियांचा दर्जा,त्यांचे स्थान, बालकांचे आरोग्य,त्यांची स्वच्छता, रोगराई, जात पंचायत यामध्ये होणारी स्त्रियांची कुचंबना याचा अभ्यास करणार आहोत. जेंव्हा-जेंव्हा आपल्या कुटूंबावर अन्याय अत्याचार होत असतो तेंव्हा पारधी स्त्री ही कुटूंबाची खरी धुरा ही संभाळीत असते.” अन्याया विरोधात ती पुरुषापेक्षा जास्त आघाडीवर असते.

6) प्रकरण पाचवे :पारधी जमातीतील रुढी,परंपरा,न्यायपंचायत :

- देव-देव (कारण)- दसरा व नवीन वर्ष मराठीतील गुढीपाडवा (गुढी) चढवणे याला महत्वाचे स्थान आहे.
- शिवा-शिव-बाट याला खुप महत्व असते.
- परस्त्री-गमन यावर कठोर निर्बंध आहेत.

- **पर पुरुषांशी संबंध स्थापल्यावर त्याला समाज बहिष्कृत करतो.**
- **मुलीला हुंडा द्यावा लागतो (मुलींच्या आईवडीलांना मुलाकडून हुंडा देण्यात येतो)**
- **महिण्यातील पाच दिवस महिलेला अन्न शिजविणे,भाकरी करणे वर्ज्य असते.**
- **पारधी समाज हा 'देवी' ला पुजणारा आहे.**
- **हिंगलाज माता,वाघजाई देवी ही प्रमुख पाच कुळींची (आई) माता असते.**
- **गरम उकळत्या तेलातून देवींच्या नावावर पुऱ्या काढणे याला या समाजात जास्त महत्व असते.**
- **धिज-इमान,अशा प्रथा पारधी जमातीच्या संस्कृतीमध्ये प्रामुख्याने आहे. या रुढी परंपरेचा सतत पूर्वीपसून आजतगायत याचा वापर हा पारधी समाज करत असतो.**
- **फक्त आई व बायको (सोडून) दुसऱ्या (पारधी जातीतील) स्त्रियांच्या हातचे जेवन हे पुरुषांना जमत नाही.**

या प्रकरणात वरील बाबींचा सखोलपणे (विस्तृतपणे) अभ्यास करणार आहोत.

❖ उपसंहार :

संशोधन आराखडा हा स्थूल स्वरुपाचा आहे. संशोधना दरम्यान त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. संशोधन दरम्यान त्यामध्ये गरजेनूसार, संशोधक मार्गदर्शकांच्या सुचनेनूसार त्यामध्ये योग्य तो बदल करण्यात येईल.

❖ निष्कर्ष व शिफारशी :-

वरील प्रमाणे पारधी जमातीच्या स्त्रियांचे समाजातील स्थान व पारधी जमातीच्या समस्या याच्या अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष हे शेवटी मांडले जातील. निष्कर्षावर आधारित योग्य त्या शिफारशी महाराष्ट्र शासन व भारत सरकारकडे करण्याचा प्रयत्न केला जाईल.

-: संदर्भ ग्रंथसूची :-

❖ प्राथमिक साधने :

1) मुलाखतीतुन प्राप्त माहिती जिल्ह्यातील

❖ दुय्यम साधने :

1) संशोधन पध्दती व संशोधन प्रकाशनाची निती तत्वे-डॉ.संतोष खिराडे, जयश्री पाटील, प्रशांत पब्लिकेशन.
2) चोरटाकार-संतोष देवरा पवार आदिवासी पारधी विकास संस्था,दहिवडी प्रकाशन मान
3) विमुक्तायन-लक्ष्मण माने, यच प्रतिष्ठान मुंबई-1997
4) प्राचिन भारतीय समाज संस्कृती संवर्धन-डि.डि.कोसंबी
5) वकील पारधी-लक्ष्मण गायकवाड,मॅजीस्टीक प्रकाशक मुंबई द्वितीय आवृत्ती-2006
6) कोल्हाट्याच पोर-किशोर शांताबाई काळे
7) पालातील माणसं-मोरे विमल
8) मराठवाड्याचा इतिहास-डॉ.अनिल कठारे, डॉ.नगाराळे एम.एस.
9) आदिवासी लोकगितेतील स्त्रि जिवन-हिवाळे अलका
10) भारतीय नारी प्रगती के पथपर-पन्नीकर रजनी दिल्ली नॅशनल पब्लिशिंग हाऊस 1990
11) भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती-श्री.वामनराव सिंगम चंद्रपुर 1992
12) भटक्या विमुक्तांची जात पंचायत-रामनाथ चव्हाण,देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स पुणे 2002
13) आदिवासींच्या समस्या आणि विश्लेषण-डॉ.गोविंदगारे, आदिवासी समाज विज्ञान प्रकाशक पुणे-176
14) भारतातील गुन्हेगारी जमात-डॉ.जमुनादास के 2003
15) गाववाडा-त्रि.ना.अत्रे
16) देशोधडी-डॉ.नारायण भोसले

संशोधक	मार्गदर्शक
कृष्णा दुर्गाजी शिंदे	प्रा.डॉ.जे.एम.बोचरे
एम.ए.बी.एड (इतिहास) पेट	